# स्नेहबंध

## डॉ. राजेंद्र वाटाणे
## यांच्यावरील गौरवपर लेख



संपादक

डॉ. दिलीप काकडे
डॉ. प्रेक्षंजय लिपटे
डॉ. गजानन सयाम
डॉ. अनिता जवदंड

Snehabandha

Editors - Dr. Dilip Kakade, Dr. Prekshanjay Lipte,
Dr. Gajanan Sayam, Dr. Anita Jawadand

स्नेहबंध

संपादक : डॉ. दिलीप काकडे, डॉ. प्रेक्षंजय लिपटे,
डॉ. गजानन सयाम, डॉ. अनिता जवदंड

प्रथम आवृत्ती : २९ जानेवारी २०२३

ISBN : 978-93-93673-21-3

© विदर्भ संशोधन मंडळ
सिव्हील लाईन्स, नागपूर

प्रकाशक
राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स
राजविलास टॉकीज जवळ, महाल,
नागपूर - ४४० ०३२

अक्षरजुळवणी व मुद्रक
महालक्ष्मी ऑफसेट, सिरसपेठ,
नागपूर

मूल्य : ₹ २००.००

# अनुक्रमणिका


१. डी. लिट्. पदवीचे मानकरी
- डॉ. मदन कुलकर्णी १

२. प्रतिष्ठाप्राप्त प्राध्यापक
डॉ. वि.स. जोग ७

३. डॉ. राजेंद्र वाटाणे यांचे नाविन्यपूर्ण संशोधन ९
- डॉ. शशिकांत सावंत

४. लोक-लौकिक संचितावरील संशोधन ११
- डॉ. मधुकर वाकोडे

५. मावळत्या लोककला प्रकारावरील नवीन संशोधन १२
- डॉ. विश्वनाथ शिंदे

६. मैत्रीचा नितळ धागा... १४
- डॉ. अविनाश आवलगावकर

७. मित्ररत्न १७
- डॉ. मनोहर रोकडे

८. समाजमित्र २०
- डॉ. ईश्वर नंदपुरे

९. माझा सार्थ अभिमान २४
- डॉ. प्रदीप विटाळकर

१०. महाविद्यालयातील मराठी विभागाचा सन्मान वाढविणारे प्राध्यापक ३०
- डॉ. शरयू तायवाडे ३३

११. बहुआयामी व्यक्तिमत्त्व
- डॉ. सुनीता सांगोले ३५

१२. घनशिळा : एका काव्यकमळाची उमलण
- प्राचार्य डॉ. रा. गो. चवरे

१३. दुर्मीळ व्यक्तिमत्त्वाचे धनी
- डॉ. दिनेश काळे ४०

१४. व्यासंगी व्यक्तिमत्त्व
- डॉ. भारती खापेकर ४३

१५. अजातशत्रू व्यक्तिमत्त्व
- डॉ. दिलीप काकडे ४६

१६. भावलेले व्यक्तिमत्त्व
- डॉ. सुदर्शन दिवसे ४९

१७. उत्तुंग भरारी
- डॉ. मधुकर नंदनवार ५३

१८. ऋणानुबंध
- प्रा. डॉ. व्यंकटेश संपतराव पोटफोडे ५७

१९. अविश्रांत श्रमाची फलश्रृती
- डॉ. कोमल ठाकरे ६०

२०. मराठी साहित्याचे साक्षेपी अभ्यासक
- डॉ. हरिदास देविदास आखरे ६४

२१. विद्यार्थी हिताय - विद्यार्थी सुखाय
- डॉ. सौ. अनिता जवदंड ६७

२२. संयमी व्यक्तिमत्त्वाचे
- डॉ. भारती वसंतराव ताठे (जवादे) ६९

२३. संस्काराची रुजवण
- डॉ. चक्रधर ठवकर ७२

२४. गुरूछत्र
- डॉ. कल्पना किशोर टालाटुले ७६

२५. एक स्नेहशील व्यक्तिमत्त्व
- डॉ. विलास खुणे ८०

# उत्तुंग भरारी

**डॉ. मधुकर नंदनवार**
भिवापूर
मो. ९४२३६३४०१५

प्रा. डॉ. राजेंद्र वाटाणे माझ्या मित्रपरिवारातील एक महत्त्वाचे असे सलोख्याचे जिवलग मित्र. या जिवलग स्नेह्याची ओळख तशी फार उशिराने झाली. म्हणजेच विद्यार्थी दशेत नव्हे तर प्राध्यापकीय सेवेत कार्यरत असताना एक जिवाभावाचा मित्र मिळावा व बालपणीच्या मित्रत्वापासूनचे संबंध वृद्धिंगत व्हावे अशी परिस्थिती निर्माण झाली. कारण मी भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथे सन १९९६ ला सेवेत रुजू झालो. त्याआधी डॉ. वाटाणे सरांनी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कोराडी येथे अध्यापनाचे कार्य सुरु केले होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या निमित्ताने परिषदेत त्यांची व माझी ओळख झाली व तेव्हापासून मला माझा खरा जिवलग मित्र मिळाला. मित्र म्हणून नव्हेत तर सदैव सहकार्य करणारे, कुठल्याही वेळी मदतीचा हात पुढे करून कोणत्याही कार्यात सतत तत्पर असणारे असे व्यक्तिमत्व डॉ. वाटाणेसरांच्या रुपाने मला प्राप्त झाले.

मला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून माझ्या 'भंडारा जिल्ह्यातील लोकनाट्य 'दंडार' या आचार्य पदवीच्या प्रबंधाला ग्रंथरुपाने प्रकाशित करण्याची मंजुरी मिळाली व अवघ्या तीन महिन्याने पुस्तक विद्यापीठ प्रकाशन विभागाला सादर करणे फारच अवघड काम होते. त्यावेळी डॉ. राजेंद्र या जिवलग मित्राची मदत फार महत्त्वाची ठरली. अशा कठीण प्रसंगात डॉ. वाटाणे यांनी मला जे सहकार्य केले ते विसरता येत नाही. मी जेव्हा त्यांच्याकडे गेलो तेव्हा त्यांनी "तुम्ही चिंता करू नका" मी सोबतीला आहे. दिलेल्या मुदतीत आपण ग्रंथाच्या प्रती सादर करु अशी सरांनी हमी देताच मी चिंतामुक्त झालो व लगेच त्याच दिवसापासून मी व सर कामाला लागलो. प्रकाशकाची शोधाशोध सुरु केली. परंतु कोणताही प्रकाशक तीन महिन्यात पुस्तक काढण्यासाठी तयार नव्हता. डॉ. वाटाणे सरांना या आधी पुस्तके छापणारा प्रकाशक मिळाला होता. डॉ. वाटाणे हे विद्यापीठाच्या मराठी पाठ्यपुस्तक समितीचे सदस्य असल्यामुळे राघव पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्सचे अर्पित खंडेलवाल यांच्याशी फोनवरून बोलले व त्यांनी तीन महिन्याच्या

आत दिलेल्या मुदतीच्या आत पुस्तक छापण्याठी होकार दिला. मी व डॉ. वाटाणे दोघेही मिळून राघव पब्लिशर्स व डिस्ट्रीब्युटर्स, महाल, नागपूर येथे पोहोचलो व त्यांच्याशी ठराव केला, त्यांच्याकडून कोटेशन मागवून विद्यापीठाच्या ग्रंथालयातून मंजूरी घेतली व पुस्तकाचे काम सुरु झाले. बघता बघता दोन महिन्यात छपाईचे काम पूर्णत्वास आले. शेवटी पुस्तकाला ब्लर्ब देण्याचेही काम डॉ. हरिश्चंद्र बोरकर या झाडीपट्टीच्या ख्यातनाम संशोधकांनी केले तर डॉ. वाटाणे यांनी माझ्या "भंडारा जिल्ह्यातील लोकनाट्य 'दंडार' या पुस्तकाला 'प्रस्तावना' दिली. स्वतः होऊन डॉ. वाटाणे यांनी पुस्तकाच्या सुरुवातीच्या कार्यापासून (दर्जेदार साहित्य) ग्रंथाच्या पूर्णत्वापर्यंत मला मोलाची मदत केली. त्याचे हा स्नेह माझ्या ग्रंथात कायमरुपी नमूद राहणार आहे.

विदर्भ साहित्य संघाचा 'नवोदित साहित्य' लेखनाचा पुरस्कार 'भंडार जिल्ह्यातील लोकनाट्य 'दंडार' या पुस्तकाला जाहीर झाल्याचे विदर्भ साहित्य संघ, नागपूर कार्यालयाकडून फोनवरून कळले व दुसऱ्याच दिवशी सर्व दै. वृत्तपत्रात ही बातमी झळकली. माझ्या आयुष्यातील अतिशय आनंदाचा हा दिवस होता. सर्वप्रथम ही बातमी माझे परममित्र डॉ. वाटाणे यांना सांगितली त्यावेळी त्यांनाही अपार आनंद झाला. त्यांनी माझे मन:पूर्वक अभिनंदन केले व रोख पुरस्कार सन्मानचिन्ह व पुरस्काराची त्यांनी वाहवा केली. एवढेच नव्हे तर या भव्यदिव्य पुरस्कार सोहळ्याला ते आवर्जुन उपस्थित राहिले व आणखी आपणास पुरस्कार मिळण्यासाठी साहित्यलेखन करावे असे म्हणून पुढील कामात माझे मनोधैर्य वाढविले.

माझ्या भिवापूर महाविद्यालयातर्फे निघणाऱ्या 'VIBGYOR' या जरनल करिता मी डॉ. वाटाणे सरांना सहसंपादकीय मंडळात राहण्यासाठी विचारले असता त्यांनी सरळसरळ कोणतीही आडकाठी व विचार न करता होकार दिला. त्यामागे स्नेहाचे असेलेले भावबंध होय.

डॉ. राजेंद्र वाटाणे रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या वाणिज्य भाषा अभ्यास मंडळात कार्यरत आहेत. अभ्यास मंडळात ते वारंवार निवडून येतात. ही त्यांच्या स्वभावाची, कार्यकर्तृत्वाची स्नेहाची पावती होय. माझे मित्र या नात्याने विद्यापीठाशी संबंधित कोणतेही काम असो मी त्यांना सांगताच त्यांचा होकार असतो. आजपर्यंत कोणत्याही कामासाठी.त्यांनी नकार दिला नाही. माझ्या मित्रपरिवातील विषयाचे प्राध्यापक असोत किंवा नसोत विषयाशी संबंधित कार्य करण्यास ते सदैव तत्पर असतात. पेपर मूल्यांकनाचे पत्र मला व माझ्या प्राध्यापक मित्रांना जबाबदारीने स्वतः हिरीरीने पुढे होऊन काढून देतात. मूल्यांकनासाठी प्राध्यापकांना प्रेरीत करून पेपरचे मूल्यांकनाचे

वेळी प्राध्यापकांना मूल्यांकन कसे करायचे याविषयी माहिती देतात व सहकार्य करतात त्यामुळे त्यांचा विद्यापीठात नावलौकिक आहे.

रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तक संपादक मंडळात त्यांचा फार मोठा वाटा आहे. आवश्यक मराठी अभ्यासक्रम बी.ए., बी.कॉम. व बी.एस.सी. विषयाच्या पुस्तकाच्या संपादक मंडळात कार्यरत असल्यामुळे पाठ्यक्रम तयार करून अभ्यासक्रमाची निवड करण्यापासून तर प्रूफ रिडींगचे काम व प्रकाशकाकडून पुस्तके मागण्याच्या कार्याची जबाबदारी डॉ. वाटाणे सर स्वत:कडे घेऊन पूर्ण करण्याचे धाडस करतात व पूर्णत्वास नेतात. शिवाय अभ्यासक्रम हा विद्यार्थीकेंद्रीत व सर्वाभिमुख कसा करता येईल याकडे देखील विशेषत्वाने लक्ष देतात.

तायवाडे महाविद्यालयात वेळोवळी राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित केल्या जातात. तेव्हा त्यांनी मला हक्काने शोधनिबंध लिहिण्याचे व शोधनिबंधाचे वाचन तसेच उपस्थितीत राहण्यास सांगतात, मी त्यांना होकार देतो. मला ज्या ज्यावेळी संशोधनात्मक लेखन करण्याची गरज असते त्यावेळी मदत करण्यासाठी डॉ. वाटाणे सर नेहमीच तत्पर असतात.

प्रा. डॉ. राजेंद्र वाटाणे सरांची विदर्भ संशोधन मंडळाच्या सचिव पदी नेमणूक झाल्यामुळे मला त्यांचा अभिमान वाटला व आनंदही झाला. मी त्यांचे अभिनंदन केले. त्यांचे संशोधनात्मक कार्य, अभ्यासूवृत्ती व कर्तव्यतत्पर व्यक्तिमत्व यामुळेच विदर्भ संशोधन मंडळाचे अध्यक्ष गुरुवर्य डॉ. मदन कुलकर्णी यांनी त्यांच्यावर सचिवपदाची धुरा सोपविली व त्यांनी ती लिलया पेलली आहे. लगेच सरांनी मला सर्वात आधी हक्काने तुम्हाला सदस्य व्हायचे आहे नंतर बाकीच्यांना सदस्य करू असे म्हणून मला सदस्य केले. त्यानंतर विदर्भ संशोधन मंडळात सदस्यांची संख्या वाढविण्याचे कार्य त्यांच्या मनमिळावू व सभ्य अशा स्वभावामुळे झाले. त्यामुळे अनेक अभ्यासू व प्राध्यापकांचे विदर्भ संशोधन मंडळाशी स्नेहबंध जुळल्या गेले. शिवाय त्यामुळे अनेकांना हक्काचे संशोधनपर व्यासपीठ प्राप्त झाले.

विदर्भ संशोधन मंडळाचा वर्धापन दिन असो, व्याख्यान, चर्चासत्र किंवा पुरस्कार वितरणासारखा कार्यक्रम असो किंवा वार्षिक प्रकाशनाचा, त्या सर्व कार्यक्रमाला डॉ. वाटाणे सर मला नुसते पत्रिका पाठवून सोडत नाही तर आवर्जुन फोन करून उपस्थित राहण्यास हक्काने सांगतात. मी परम मित्र या नात्याने हजर असतो.

प्रा.डॉ. वाटाणे सर एक सर्वसर्वा असे व्यक्तिमत्व. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. काही पुस्तकांना पुरस्कार मिळाले आहेत. पदवी स्तरावर व पदव्युत्तर स्तरावर अध्यापनाचे कार्य करतांना एम.फील्.च्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले

आहे. अनके विद्यार्थ्यांना आचार्य पदवी प्राप्त झाली आहे. अनेक विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली आचार्य (पीएच्.डी.) चे संशोधन कार्य करीत आहेत. त्यामुळे मी त्यांना संशोधकापेक्षा मार्गदर्शक यां नात्याने पाहतो. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक संशोधन कार्यात मिळणाऱ्या आनंदात मी माझा आनंद मानतो. असे माझे परम स्नेही डॉ. राजेंद्र वाटाणे यांच्याविषयी कितीही लिहिले तरी अपूर्णच राहील. त्यांच्या कार्याच्या उत्तुंग झेपेला अशीच भरारी मिळत राहो अशी सदिच्छा! तसेच त्यांना प्राप्त झालेल्या डी.लिट. या पदवी बद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन!

■■■